**जुबेदाबी पठाण विरुध्द लिंबाजी शेवाळे व इतर**

## नि.क्र. १७ वर आदेश पारीत.

वादीने मौजे राजवाडी ता. सेलु जि. परभणी येथील शेत गट क्रमांक ३६ म्हणजे ३६/१ व ३६/२ ची वादी व प्रतिवादी धारण करीत असलेली शेतजमिन ७/१२ प्रमाणे वहिवाटी व ताब्याप्रमाणे सरकारी मोजणी भुमी अभिलेख कार्यालया मार्फत करण्यात येण्याबाबत प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे.

०२. वादीचे असे म्हणणे आहे की, ती मौजे राजवाडी येथील शेत गट क्रमांक ३६/१ एकुण क्षेत्र ३ हे ६० आर पैकी ० हे ४० आर व शेत गट क्रमांक ३६/२ एकुण क्षेत्र १ हे ६२ आर पैकी ४२ आर ची मालक व ताबेदार असुन गट क्रमांक ३६/२ मधील उर्वरित शेत जमिन ही वादीच्या मुलाच्या नावे आहे जी शेत जमिन ही वडीलोपार्जीत शेत जमिन आहे. वादीचे पुढे असे म्हणणे आहे की, यापुर्वी गट क्रमांक ३६ हा एक गट होता व त्यानंतर भुमी अभिलेख कार्यालयामार्फत सदरचा गट हा दोन गटात ३६/१ व ३६/२ मध्ये विभागला गेला त्यामुळे वादीची काही शेत जमिन ही शेत गट क्रमांक ३६/१ व काही शेत जमिन ही शेत गट क्रमांक ३६/२ मध्ये विभागली गेली आहे. वादीचे पुढे असे ही म्हणणे आहे की, वादीच्या मालकी व ताब्यातील शेत गट क्रमांक ३६/१ मधील वादीच्या ताब्यातील क्षेत्र ० हे ०५ आर ने कमी भरत असल्या कारणाने वादीने सदरचा दावा हा मोजणी करुन ० हे ०५ आर जमिनीचा ताबा परत घेण्यासाठी दाखल केला आहे. वादीच्या मालकी व ताब्यातील गट क्रमांक ३६/१ व ३६/२ मधील क्षेत्राची सरकारी मोजणी भुमी अभिलेख कार्यालयामार्फत होणे गरजेचे आहे. जेणे करुन वादीचे क्षेत्र कमी झालेले प्रतिवादीकडुन ताबा घेणे सोपे होईल. त्यामुळे वादीच्या मालकी व ताब्यातील शेतजमीनीची भुमी अभिलेख कार्यालयामार्फत मोजणी होणे आवश्यक आहे.

०३. प्रतिवादींतर्फे सदरच्या अर्जावर म्हणणे दाखल केले नसल्याने त्यांच्या विरुध्द विना म्हणणे आदेश पारीत करण्यात आला.

०४. प्रस्तुतचा दावा हा वादीनी त्यांच्या शेतजमिनीवर प्रतिवादींनी केलेल्या अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा परत मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुतच्या दाव्याचे स्वरुप तसेच वादीने केलेली मागणी व तिच्या मालकी हक्काच्या शेत जमिनीवर प्रतिवादींनी अतिक्रमण केले आहे काय तसेच त्यांनी अतिक्रमण केले असल्यास ते किती क्षेत्रफळावर आहे हे तोंडी पुराव्यां आधारे सिध्द होऊ शकत नाही. त्याकरीता संपुर्ण गट क्रमांक ३६ ची शासकिय यंत्रणेमार्फत मोजणी होणे आवश्यक आहे. असे दिसुन येते की, वादीने तिची व तिच्या

नातेवाईकांची गट क्रमांक ३६/१ व ३६/२ ची सरकारी मोजणी भुमी अभिलेख कार्यालयामार्फत करण्यात यावी व ७/१२ प्रमाणे, धारण करीत असलेले क्षेत्र तसेच वहिवाटीमध्ये असलेले वादी व प्रतिवादी यांचे क्षेत्र तसेच वहिवाटीमध्ये असलेले वादी व प्रतिवादी यांचे क्षेत्र मोजणी करण्याची मागणी केली आहे. परंतु संपुर्ण गट क्रमांक ३६/१ व ३६/२ ची मोजणी झाल्या शिवाय वादीच्या जमिनीवर नेमणे कोणाचे अतिक्रमण निघते हे स्पष्ट होणार नाही. अशा परिस्थीतीत, संपुर्ण गट क्रमांक ३६ ची मोजणी होणे आवश्यक असल्याचे दिसुन येते. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

०१. अर्ज नि.क्र.१७ मंजूर करण्यात येतो.

०२. मौजे राजवाडी ता. सेलु जि. परभणी येथील संपुर्ण गट नंबर ३६ म्हणजे ३६/१ व ३६/२ या शेताची, मोजणी करण्याकरिता उप–अधीक्षक, भुमि अभिलेख, सेलू यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येते.

०३. उप–अधीक्षक, भुमि अभिलेख, सेलू यांना निर्देश देण्यात येतो की, त्यांनी संपुर्ण गट क्रमांक ३६ ची मोजणी करुन वादीच्या जमीनीसंदर्भात जायमोक्यावर असलेल्या स्थितीचा पंचनामा, नकाशा तयार करुन तत्संबंधीचा सविस्तर अहवाल प्रस्तुत प्रकरणी लवकरात लवकर दाखल करावा.

०४. वादीने मोजणीसाठी चे आवश्यक शुल्क तालुका भुमी अभिलेख कार्यालय, सेलु येथे जमा करावे.

०५. वादीने मोजणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे व दाव्याची प्रत न्यायालयीन आयुक्त यांना पुरवावी.

०६. येणे प्रमाणे न्यायलयीन आयुक्त यांना प्रस्तुत आदेशाचे पत्र जारी करण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MANDAR MOHAN RAUT
Date: 2022.08.30 11:47:21 +0530

दिनांक – २९.०८.२०२२

**(मंदार मो.राऊत)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सेलू जि.परभणी